**Report on IDEA HUNTING AND PITCHING**

Prof. S.S. Rathi has worked as Resource Person at event on IDEA HUNTING AND PITCHING at Sant Gadge Baba Amravati University.



पुण्य नगरी | नागपूर, मंगळवार, १८ जुलै २०२३

# विद्यापीठात 'आयडिया हन्टिंग अ‍ॅण्ड पिचिंग इव्हेंट १.०' कार्यक्रम आज

**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, एमआयडीसी, यांच्या संयुक्त विद्यमाने 'आयडिया हन्टिंग अ‍ॅण्ड पिचिंग इव्हेंट १.०' या कार्यक्रमाचे आयोजन उद्या, मंगळवार, १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून नालंदा विद्यापीठाचे कुलपती पद्मभूषण डॉ. विजय भटकर उपस्थित राहतील. कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. सदर कार्यक्रमाला विशेष निमंत्रित म्हणून औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष किरण पातुरकर,



सचिव आशिष सावजी, प्रो. रामचंद्र मंथलकर, डॉ. त्रिवेणी अय्यर, उज्वल बजाज उपस्थित राहतील.

सदर कार्यक्रमाला गुंतवणूकदार पॅनल आणि तज्ञ म्हणून रणजीत बंड, सुरेश ठाकूर, सीए असोसिएशनचे अध्यक्ष विष्णूकांत सोनी, अमित शहा, अखिलेश राठी, जयेश पनपालिया, प्रो. सर्वेश राठी उपस्थित राहतील. आयडियाज, प्रोटोटाईप्स, नेटवर्किंग, स्टार्टअपकरिता फायनान्शियल आणि मार्केटिंग सपोर्ट आदींचा प्रचार करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.